UNIVERSITY GRANTS COMMISSION, NEW DELHI

# "An Analytical Study of Political Functions of Dr. Panjabrao Alias Bhausaheb Deshmukh, With Special Reference to Vidarbha".

## MINOR RESEARCH PROJECT

## SUMMARY

By
K. A. Mahure
Asstt. Professor
Department of Political Science
Dr. Gopalrao Khedkar Mahavidyalaya Gadegaon (Telhara).
Dist. Akola-444 108

"डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या राजकीय कार्याचा विश्लेषणात्मक अभ्यास विशेष संदर्भ : विदर्भ "

**("An Analytical Study of Political Functions of Dr. Panjabrao Alias Bhausaheb Deshmukh, With Special Reference to Vidarbha")**

## Summary

## सारांश


भारतीय संविधानाच्या निर्मितीच्या कार्याबरोबरच समाजकारण, शैक्षणिक, कृषिविषयक आणि राजकारणात आपल्या कर्तव्याचा ठसा उमटविणारे डॉ. पंजाबराव शामराव देशमुख यांचे नांव त्यांच्या कार्यामुळे अग्रक्रमाने घ्यावे लागते. सार्वजनिक जीवनात कार्य करणा-यांना डॉ. पंजाबराव अनेक दृष्टिने स्फुर्तीदायक आहेत. अशा या महामानवाचा जन्म अमरावती जिल्हयातील पापळ या छोटयाशा गावात 27 डिसेंबर 1898 रोजी झाला. त्यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण अमरावती जिल्हयातील ग्रामिण भागात झाले. महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांनी पुण्यातील प्रख्यात फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. उच्च शिक्षणासाठी ते इंग्लंडला गेले, तेथिल केंब्रीज व एडिंबरो विद्यापीठात एम. ए. (ऑनर्स) डि. फील. बार-अॅट लॉ. यासारख्या उच्च पदव्या त्यांनी प्राप्त केल्या उत्तम नोकरी करुन चांगले जीवन ते जगु शकले असते. परंतु तसे न करता आपले संपूर्ण आयुष्य त्यांनी देशसेवेत व जनकल्यानासाठी खर्ची घातले. डॉ. पंजाबराव देशमुखांनी केलेल्या राजकीय कार्याचे विश्लेषनात्मक अध्ययन करणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रस्तुत लघुशोध प्रकल्पात त्यांच्या राजकीय कार्याचा विश्लेषणात्मक अभ्यास केला आहे.

डॉ. पंजाबरावांनी आपल्या कार्याची सुरुवात विदर्भातील शेतक-यांच्या प्रश्नांपासून केली. वैदर्भीय शेतकरी अत्यंत हालअपेष्टा सहन करुन शेतात राबतो, सर्वासाठी अन्नधान्य निर्माण करतो. परंतु त्यांच्या स्वतः साठीच खाण्याची सोय नाही, पिण्याच्या पाण्याची सोय नाही निवा-यासाठी पुरेशी जागा नाही. शेतक-यांने फक्त कष्ट करायचे आणि समाजातील वरीष्ठ समजणा-यांनी प्रतिष्ठा मिरवायची याचे दुःख भाऊसाहेबांना झाले. शेतक-यांचे दुःख, दारिद्रय नाहीसे करण्यासाठी प्रथम तो शिक्षित झाला पाहिजे. स्वतःचे आणि सभोवतालच्या विश्वाचे ज्ञान त्याला झाले पाहीजे. यासाठी शेतक-याने शिक्षण घेतले पाहीजेत. याच जिव्हाळयातून 1932 साली डॉ. पंजाबरावांनी श्री शिवाजी शिक्षण संस्था स्थापन केली. त्यांचा शैक्षणिक दृष्टिकोन शेतीला जीवन व समाजाला शिक्षण असा होता. समाजाच्या विकासाकरीता शिक्षण आवश्यक आहे. शिकलेला समाजच उत्तम शेती करु शकतो आणि शेतीच भारतीय व्यवस्थेचा मूळ आधार आहे याच दृष्टिकोनातुन त्यांनी शिक्षण विषयक कार्य केलीत.

डॉ. पंजाबरावांच्या महत्वाकांक्षा वैयक्तिक नव्हत्या तर सामाजिक स्वरुपाच्या होत्या त्यांना मुलगामी समाजपरिवर्तन घडवायचे होते. समाजाची प्रगती होता होता जातीप्रथा नष्ट व्हावी हा त्यांचा विचार होता. महात्मा ज्योतीबा फुले व राजर्षि शाहू महाराज सामाजिक कार्यात त्यांचे आदर्श होते. डॉ. पंजाबरावांच्या जीवत कार्यात शेतकरी व शिवाजी ही दोन स्फूर्ती स्थान होती, म्हणुन त्यांच्या दोन्ही जगप्रसिध्द संस्थाना त्यांनी 'भारत कृषक समाज ' व 'श्री शिवाजी शिक्षण संस्था ' ही नांव दिलीत. या संस्थांच्या माध्यमातून त्यांनी समाज सेवेची कार्य केली. राजकारणाला समाज सेवेची बटीक म्हणून ते राबवित. विदर्भाच्या राजकारणात काही ठराविक लोकांची मक्तेदारी होती. भाऊसाहेबांनी ती संपूष्टात आणली आणि विदर्भाचे राजकारण बहुजन समाजाच्या कक्षेत आणले. त्यामुळे विदर्भातील सारा बहुजन समाज जागृत झला. एवढेच नाही तर आज राजकारणाचे नेतृत्व बहुजन समाजाच्या हातात आले आहे. 1951-52 साली लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूका पार पाडल्या. लोकसभेच्या पहिल्याच निवडणूकीत डॉ. पंजाबराव विदर्भातून प्रचंड बहुमताने निवडुन आले. या नेत्र दिपक यशामुळे डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भातील जनतेचा विश्वास असलेली एक प्रचंड शक्ती आहे याची जाणीव कॉंग्रेसश्रेष्ठींना झाली. नवभारताच्या उभारणीसाठी या शक्तीचा उपयोग करुन घ्यायचे पंडित जवाहरलाल नेहरुंनी ठरविले. त्यादृष्टीनी नेहरुंनी डॉ. पंजाबरावांवर मंत्रीपदाची जबाबदारी सोपविण्याचा निर्णय घेतला. 12 ऑगष्ट 1952 रोजी स्वतंत्र भारताचे पहिले कृषिमंत्री म्हणून डॉ. पंजाबराव देशमुखांनी शपथ घेतली. मंत्रिपदाची सुत्रे स्विकारल्यानंतर कृषिविषयक प्रश्नांचा सखोल अभ्यास केला. संपूर्ण भारतात जपानी भातशेतीच्या पध्दतीचा प्रचार करुन तांदुळ उत्पादनाच्या बाबतीत क्रांतीकारी बदल घडवुन आणण्याचे कार्य त्यांनी केले. जपानी पध्दतीत केलेल्या भातशेतीमुळे शेतक-यांचे उत्पन्न कमालीचे वाढले. या अभिनव प्रयोगाच्या प्रचंड यशामुळे संपूर्ण जगाचे लक्ष भारताने आपल्याकडे वेधून घेतले.

वर्तमान काळातील राजकारणाचे स्वरुप देशहितासाठी मारक आहे हे सांगण्यासाठी ज्योतीषाची गरज नाही. राजकीय पक्ष सत्ता हस्तगत करण्यासाठी धर्म, जात भूप्रदेश, भाषा इत्यादीचा वापर करतांना दिसतात. त्यामुळे धर्मा-धर्मात, जाती-जातीत, भूप्रदेश-भूप्रदेशामध्ये आणि भाषा-भाषामध्ये तणाव निर्माण झाले. त्याचा परिणाम एकंदरीत सर्व भारतीय व्यवस्थेवर झालेला आहे. दारिद्रय रेषाखाली जीवन जगणा-या जनतेच्या समस्येपेक्षा धर्म, जात, भाषा, भूप्रदेश यासमस्या प्रभावी बनल्या आहे. भ्रष्टाचारामध्ये आज कोणत्याही पक्षाचे नेते मागे नाही. वर्तमान काळातील आणखी एक गंभीर समस्या म्हणजे निवडणूकीतील गैरमार्गाचा अवलंब ही होय. अशा स्वरुपाचे गंभिर प्रश्न वर्तमान काळातील भारतीय राजकारणात दिसून येते. डॉ. पंजाबराव देशमुखांनी केलेल्या राजकीय कार्याची तुलना वर्तमान काळातील राजकीय कार्याशी केल्यास आजचे राजकारण व राजकीय नेत्यांची कार्य कोणत्या दिशेनी जात आहे याची कल्पना येते. डॉ. पंजाबराव देशमुखांनी निस्वार्थ भावनेने जनहीतासाठी राजकारणाचा जसा वापर केला तसे समाजाभिमुख राजकारण वर्तमान काळात झाले तर स्वतंत्र भारताचे चित्र वेगळया स्वरुपाचे दिसल्या शिवाय राहणार नाही.